**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४/२०१२ मधील नि.क्र. ४२ वरील आदेश.**
**अरूण एरंडकर -विरुध्द- श्रीरंग जाधव व इतर**
**आदेश पारित दिनांक ०७.०७.२०२३**

---

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला मुळ अर्ज संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर अर्जासहीत अर्जदार अरुण बबन एरंडकर यांचे निशाणी क्र. ४३ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जात अर्जदारने असे कथन केले आहे की, सदरचे प्रकरण चालू असताना मुळ अर्जातील जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव हे दिनांक ०५.०८.२०१६ रोजी मयत झाले आहेत. सदर मुळ अर्जाचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत जाबदेणार क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, सदर जाबदेणार यांचे विधिज्ञांनी जाबदेणार क्र. १ हे मयत झाल्याची माहिती मे. न्यायालयाच्या निदर्शनास मुदतीमध्ये आणून दिली नाही. त्यामुळे मयत जाबदेणार क्र. १ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला व त्याचेविरुध्द ॲबेटमेंटचा हुकूम झाला आहे त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

**०३.** सदरकामी, जाबदेणार यांचेतर्फे हे म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तूत अर्ज कायदेशीर नाही. सदर आर्जतील कथने धादांत खोटी, लबाडीची व बेकायदेशीर आहेत. अर्जदारास अर्ज दाखल करणेस झालेला उशीराचे कारण नमूद नाही. तरी सदरील प्रकरणी प्रस्तूतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

**०४.** अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव अर्जदार व जाबदेणार यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे योग्य वाटते. तसेच, मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे

वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला मुळ अर्ज संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा निशाणी क्र. ४२ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. मयत जाबदेणार क्र. १ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला मुळ अर्ज संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

(अ. क. दामटे)
दिनांकः- ०७.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.